नियमित. दि. दा.क्र. १०४३/२०२१

नि.क्र. ८८ आणि १००

**प्रतिवादी क्र. १ व त्यांचे विधिज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर.**

**प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे उलटतपास श्री. आर.के. खंडागळे यांचे मार्फत–**

शपथेवर सांगतो की,

१. मी आज सर्व वादीं करता साक्ष देत आहे. आम्ही हा दावा प्रतिवादीने आमच्या खरेदी घेतलेल्या मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा करु नये करीता दाखल केलेला आहे. आम्ही एकुण ३७८ चौ.फुट जागा व त्यापुढील जागेतुन येण्या–जाण्याच्या हक्कासह आशा रामचंद्र जमदाडे व रामचंद्र जमदाडे यांच्याकडुन खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आशा रामचंद्र जमदाडे यांच्याकडुन त्यांच्या मालकीची मिळकत खरेदी केली. मी मिळकत खरेदी करण्यापूर्वी त्याची कागदोपत्री चौकशी केली होती. आशा रामचंद्र जमदाडे यांच्या नावावर एकुण ३७८ चौ. जागा व त्यापुढील जागेचे हक्क खरेदी केले. सदर मिळकत हडपसर येथील सर्वे क्र. २२० पैकी होती. सदर मिळकत आशा जमदाडे यांना पहिली बक्षिसपत्राने आली होती. त्यानंतर त्यांना नोंदणीकृत वाटणी पत्राने आली होती. मी नि.क्र.१०३ वर बक्षिस पत्र दाखल केले आहे. ते आता मला दाखवले, ते तेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. १०३ वर दक्षिणेस १० फुट मोकळी जागा अशी चतुःसिमा नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आशा जमदाडे यांना बक्षिस पत्राव्दारे प्राप्त झालेलीच मिळकत मला त्यांनी विकली. हे म्हणणे खरे नाही की, आशा हिला तिच्या सासूकडुन मिळालेल्या बक्षिस पत्राप्रमाणे दक्षिणेस मोकळी जागा मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. १०३ मध्ये आशा जमदाडे हिस तिच्या सासूकडुन दक्षिणेकडील सोलापुर रोडपर्यत १० फुट जागा मिळाल्याचे नमुद नाही.

**साक्षीदारने उलटतपासातील उत्तरे देण्याकरीता पूरेसा वेळ हवा असे नमुद केल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.**

**समक्ष,**

SANJAY ANANT MULIK
Digitally signed by SANJAY ANANT MULIK
Date: 2026.08.04 18:58:31 +0530

दिनांक– ०४.०८.२०२६

**(एस.ए.मुळीक )**

१५वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पुणे.